1 8 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांगरूळ शिक्षण संस्थेचे कार्य आदर्शवत

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन: संस्थेचा हीरकमहोत्सवी वर्धापनदिन उत्साहात

वार्ताहर
सांगरूळ

ग्रामीण भागातील मुला–मुलींना गरजेनुसार शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून देत सांगरूळ शिक्षण संस्थेने केलेले शैक्षणिक विकासाचे काम उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात कार्यक्षेत्र असले तरी संस्थेचे व्हिजन चांगले आहे. यामुळेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी या संस्थेत घडले. भविष्यातही संस्था यशस्वी घोडदौड जोमाने चालू ठेवील, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला. सांगरूळ शिक्षण संस्थेच्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष यं. ल. खाडे होते.



सांगरूळ शिक्षण संस्थेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर आमदार प्रा. जयंत आसगावकर, य. ल, खाडे, बाळासाहेब खाडे, एकनाथ अंबवकर व इतर.

संस्थेचे सचिव आमदार प्रा. जयंत आसगावकर म्हणाले, जागतिक स्तरावरील स्पर्धेच्या युगात आमच्या संस्थेत घडलेला विद्यार्थी कुठेही कमी पडणार नाही असे उच्च दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. संस्थेमधून आधुनिक शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू असून कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात संस्थेची कामगिरी उल्लेखनीय असल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुणे कुलगुरू शिर्के यांच्याहस्ते ध्वजारोहण व दीपप्रज्वलन केले. संस्थेचे संस्थापक कै. स. ब. खाडे, कै. नाळे मास्तर व कै. गुरुवर्य डी. डी. आसगावकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केले. यावेळी संस्थेचे गुणवंत शिक्षक, कर्मचारी, आजी–माजी विद्याथा–विद्यार्थिनीचा गौरव केला.

यावेळी गोकुळचे संचालक बाळासाहेब खाडे, सरपंच सदाशिव खाडे, शिक्षणाधिकारी एकनाथ अंबोकर, उपाध्यक्ष के. ना. जाधव, सहसचिव डी. एन. कुलकर्णी, संचालक मदन पाटील, डी. जी. खाडे, बी. आर. नाळे, आनंदा कसोटे, इंदुबाई आसगांवकर, अनु आसगावकर, अनिल पाटील, अमर पाटील, एस. डी. लाड, विनय पाटील, राजाराम वरुटे, सीताराम पाटील यांच्यासह परिसरातील गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षण संघटनांचे पदाधिकारी, संस्थेच्या सर्व शाखांचे शाखाप्रमुख, शिक्षक, कर्मचारी, आजी–माजी विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. आभार आर. बी. गोंधळी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. नीता पवार यांनी केले.

18 DEC 2021
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'

## शेतीसंदर्भातील अवजारे, प्रक्रिया, उत्पादने याबाबत समस्या, उपायांची माहिती पाठविण्याचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्रातर्फे कृतिशील व नवसंकल्पनांना मूर्त रूप देण्याची आवड असणाऱ्या विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना रोजच्या आयुष्यात उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सूचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय दिला जाईल. यावर विद्यार्थी शिक्षक, नागरिक त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न व त्यावर शोधलेला कल्पक पर्याय अथवा उत्तर, समाधान याची माहिती भरू शकतात. याकरिता गुगल फॉर्मच्या माध्यमातून एक लिंक तयार केली आहे. ही लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे.

'Home Page → News & Events → 'Monthly Innovation Challenge- December 2021' असा त्याचा मार्ग आहे. उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत नवसंशोधन व कृतिशील समस्या समाधान या बाबींना चालना मिळणार आहे.

या महिन्यातील उपक्रमाकरिता जिज्ञासूंना 'शेती संदर्भातील अवजारे, प्रक्रिया, उत्पादने' हे क्षेत्र दिलेले आहे. शेती व त्या संदर्भातील विविध उपक्रमांमध्ये शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यावरील कल्पक उत्तरे अपेक्षित आहेत. यातील सहभागींना या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.




> सतत बदलणाऱ्या स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये मूलभूत प्रश्न शोधून त्यावर प्रभावी उत्तरे व आर्थिकदृष्ट्या सक्षम पर्यायांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पक विचारांना 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'च्या माध्यमातून चालना मिळणार आहे. समस्या आणि परिस्थितीकडे पाहण्याचा नवदृष्टिकोन विकसित होण्यास नक्कीच मदत होईल.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

18 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लाईक, शेअरने फोटोग्राफीचे गांभीर्य हरवले : पवार

## पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे फोटोग्राफी कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फोटोग्राफीसाठी संयम असायला हवा. न थकता अथकपणे दीर्घकाळ परिश्रम केल्यानंतर फोटो वाचता येतो. मात्र, अलीकडे लाईक आणि शेअरसाठी फोटोग्राफी केली जात असल्याने त्याचे गांभीर्य हरवत चालले आहे, अशी खंत वाईल्ड लाईफ फोटोग्राफर स्वप्निल पवार आणि डॉक्युमेंट्री फोटोग्राफर इंद्रजित खांबे यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि व्हिजन आय फोटो व्हिडीओ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फोटोग्राफी कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी असोसिएशनचे उपाध्यक्ष आकाश चव्हाण होते.

स्वप्निल पवार म्हणाले, वाईल्ड लाईफ फोटोग्राफीमध्ये सर्व प्राण्यांना तितकेच महत्त्व आहे. कोणत्याही प्रकारच्या फोटोग्राफीत त्या फोटोचा नेमका उपयोग काय, याची स्पष्ट कल्पना असायला हवी. प्राण्यांच्या प्रजननाचा काळ किंवा प्राण्यांचे अधिवास यांची फोटोग्राफी करताना काळजी घ्यावी. वन्यजीवांचा आदर करणे आणि त्यांना त्रास होणार नाही, अशा पद्धतीने फोटोग्राफी व्हावी. जंगलाच्या आसपास राहणाऱ्या लोकांशी संवाद साधता आला तर त्या-त्या परिसरातील वन्यजीवांची माहिती मिळू शकते. फोटो काढून तो सोशल मीडियावर टाकायचा आणि त्याला लाईक्स मिळवायच्या आहेत, अशी भावना असेल तर गुणवत्तापूर्ण फोटोग्राफी होणार नाही, असेही त्यांनी सांगितले.





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित फोटोग्राफी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना वाईल्ड लाईफ फोटोग्राफर स्वप्निल पवार, डॉक्युमेंट्री फोटोग्राफर इंद्रजित खांबे.**

इंद्रजित खांबे म्हणाले, डॉक्युमेंट्री फोटोग्राफी हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कोणत्याही छोट्या विषयावर अशा पद्धतीची फोटोग्राफी करता येते. अगदी आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या भावभावना टिपूनसुद्धा उत्तम फोटोग्राफी होऊ शकते. कोकणातील ओमप्रकाश चव्हाण या दशावतार कलाकाराच्या जीवनावर उच्च दर्जाची फोटोग्राफी झाली आहे.

### गव्याला त्रास देऊ नका...

वन्यप्राणी मानवी वस्तीत का येतात, याचा विचार करायला हवा. नागरिक वन्यप्राण्यांच्या मागे धावत असल्याने ते बिथरतात आणि त्यातून अप्रिय घटना घडतात. यासाठी माणसांनी जंगली प्राण्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. कोल्हापुरात गवा आल्यानंतर नागरिकांनी ज्या पद्धतीने त्याला जेरीस आणले, ते पाहता अशा गोष्टी थांबविणे आवश्यक आहे, असे मत स्वप्निल पवार यांनी व्यक्त केले.

फोटोमध्ये सामाजिक, सांस्कृतिक बंध असतात. ते शोधता आले पाहिजेत. फोटो वाचता येणे ही एक मोठी कला असून, ती लगेचच आत्मसात होत नाही. यासाठी खूप वेळ द्यावा लागतो. सोशल मीडियाच्या जमान्यात घाईने प्रसिद्धी मिळविण्यासाठी फोटोग्राफीचा वापर केला जात आहे. मात्र, यातून गुणवत्तापूर्ण फोटोग्राफी होत नाही, असे त्यांनी सांगितले

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. कार्यशाळा सहसंयोजक अभिजित गुर्जर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी माजी समन्वयक डॉ. रत्नाकर पंडित, विवेकानंद महाविद्यालयातील फोटोग्राफी विषयाचे शिक्षक रविराज सुतार, फोटोग्राफर असोसिएशनचे पदाधिकारी, पत्रकारितेचे विद्यार्थी उपस्थित होते.